# महाराष्ट्र शासन
## कृषि विभाग
## मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) प्रकल्प
### प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष

शेती महामंडळ बिल्डींग, २७० भांबुर्डा, सेनापती बापट मार्ग, सिंबॉयसीस कॉलेज जवळ, पुणे-४११०१६
फोन नं.०२०-२५६५६५७७ / ७८, ई-मेल-pcmu.smart@gmail.com, वेबसाईट-www.smart-mh.org


जा.क्र. स्मार्ट/पीसीएमयु/प्रशासन/ 1425/२०२३ दि. ३१/०७/२०२३

प्रति,

१. श्री. नितीन राजीव इंगळे,
अर्थशास्त्रज्ञ तथा वित्त प्रवेश सल्लागार
जिल्हा अंमलबजावणी कक्ष, जळगांव

२. श्री. रुपेश भोळे,
संगणक चालक,
जिल्हा अंमलबजावणी कक्ष, जळगांव

विषय :- जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण प्रकल्प (स्मार्ट) पुणे या प्रकल्पात काम करताना मिळणाऱ्या वेतनामधील तफावतीबाबत.

संदर्भ :- १. आपले पत्र दि. २५/७/२०२३
२. शासन निर्णय क्र.कृव्यप्र ५४१९/प्र.क्र.१२९/८अे/ दि.११/११/२०२१

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, संदर्भ क्र २ वरील शासन निर्णयानुसार स्मार्ट प्रकल्पाकरीता ५०४ पदांचा (२१४ संवर्ग व २९० कंत्राटी) आकृतीबंध वेतन श्रेणी व ठोक वेतनासह मंजुर करण्यात आलेला आहे. उक्त शासन निर्णयातील अ. क्र. ११ नुसार कंत्राटी पदांकरीता प्रस्तावित केलेले ठोक वेतन ही प्रकल्प कालावधीपर्यंत सदर पदाकरीता विहीत केलेली वेतनाची कमाल मर्यादा असून कमाल वेतन मर्यादेत उचित वेतनावर पात्र उमेदवारांचे प्रकल्प संचालक / प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा प्रमुख नियुक्ती करु शकतील असे स्पष्टपणे नमुद केलेले आहे.

शासन निर्णयातील अ. नु.क्र ११ नुसार निवड झालेल्या पात्र उमेदवारांचे वेतन निश्चित करण्याकरीता प्रकल्पामार्फत खालीलप्रमाणे धोरण निश्चित करण्यात आले आहे.

अ) प्रकल्पासाठी निवड झालेल्या कंत्राटी तज्ञ / कर्मचारी यांना त्यांची प्रकल्पात निवड होण्यापूर्वीच्या आस्थापनेवरील अंतिम वेतन प्रमाणपत्रातील वेतन स्मार्ट प्रकल्पातील किमान वेतन / मानधन म्हणून देय राहील किंवा

ब) प्रकल्पासाठी निवड झालेल्या कंत्राटी तज्ञ/कर्मचारी यांचे प्रकल्पात निवड होण्यापूर्वीच्या आस्थापनेवरील अंतिम वेतन शासन निर्णयातील मर्यादेपेक्षा अधिक असल्यास, त्यांना शासन निर्णयातील मर्यादेएवढे ठोक वेतन / मानधन देय राहील. (अशावेळी प्रकल्पात नंतर वार्षिक वेतनवाढ देता येणार नाही). किंवा

क) प्रकल्पासाठी निवड झालेल्या कंत्राटी तज्ञ/ कर्मचारी यांना शासनाने निश्चित केलेल्या अधिकतम ठोक वेतन / मानधन मर्यादेच्या अधिन राहून, त्यांचे प्रकल्पात निवड

होण्यापूर्वीच्या आस्थापनेवरील अंतिम वेतनापेक्षा जास्तीत जास्त १५% पर्यंत वाढीव वेतन / मानधन देय राहील.

नियुक्तीवेळी वरील धोरणानुसार आपण सादर केलेले अंतिम वेतन प्रमाणपत्र विचारात घेऊन आपले वेतन/मानधन निश्चित करण्यात आलेले आहे. तसेच त्यांची पदस्थापना अंतिम करताना याबाबीची स्पष्ट कल्पनाही आपणास देण्यात आलेली आहे.

शासन निर्णयातील तरतुद व प्रकल्पाने निश्चित केलेले धोरण विचारात घेता आपले मानधनात बदल करणे शक्य नाही.

(ज्ञानेश्वर बोटे)
अतिरिक्त प्रकल्प संचालक,स्मार्ट